स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म.// /24-25**
**दिनांक : 16 / 06 /2024**

## वैद्यकीय आरोग्य विभाग

## माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते महानगरपालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीचे लोकार्पण

मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते सोमवार दि.१६ जून २०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालयाच्या विस्तारित इमारतीचे लोकार्पण ऑनलाईन (Online) प्रणालीद्वारे संपन्न झाले.

सर डी.एम.पेटीट रुग्णालयाच्या या नवीन विस्तारित इमारतीत रुगांच्या सेवेसाठी विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या नवीन इमारतीत रुग्ण नोंद विभाग, २५ बेडचे प्रसुतीपूर्व विभाग (ANC Ward), २५ बेडचे प्रसुती पश्चात विभाग (PNC Ward), १५ बेडचे NICU विभाग, ५ बेडचे बालरोग विभाग, गरोदर माता तपासणी ANC OPD, बालरोग तपासणी, शस्त्रक्रिया विभाग, नवजात बालक लसीकरण विभाग, औषध विभाग (Pharmacy), सोनोग्राफी विभाग, जन्म दाखला नोंदणीकरण विभाग इत्यादी विभाग रुग्णांच्या सेवेसाठी सुरु करण्यात आले आहेत.

सर डी.एम.पेटीट रुग्णालय हे नागरिकांना आरोग्य सेवा पुरविणारे वसईतील अग्रगण्य व जुने रुग्णालय आहे. रुग्णालयात दरमहा सरासरी ८ हजार ते १० हजार रुग्ण जनरल ओ.पी.डी.मध्ये उपचार घेत असतात. तसेच मासिक सरासरी ५०० ते ५५० आंतररुग्ण दाखल होतात. त्यापैकी २५० ते ३०० प्रसुती, व १०० ते १५० लहान-मोठ्या शस्त्रक्रिया होत असतात. रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता रुग्णालयाचे विस्तारीकरण करणे आवश्यक असल्याने मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्या रुग्णालयाच्या मागील बाजूकडील जागेत नवीन इमारत बांधण्यात आली. रुग्णालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीमुळे अधिकाधिक रुग्णांना वैद्यकीय सेवा देणे शक्य होणार आहे.

वैद्यकीय आरोग्य विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका